# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-०७** **दिनांक - ०८/०१/२०२४**

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा विभागाला बालकांच्या अपहरणातील १०६ अपहरीत बालकांचा शोध घेण्यात यश

अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी सन २०२३ मध्ये मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ २ व ३ मधील पोलीस ठाण्यात दाखल भा.द.वि.स. कलम ३६३ गुन्हयामधील १०४ गुन्हे उघड करुन १०६ अपहरीत बालकांचा शोध घेवुन सदर अपहरीत बालकांना त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

वरीष्ठांनी वेळोवेळी मार्गदर्शन करुन बालकांच्या अपहरणासंबंधीत दाखल होणाऱ्या गुन्हयाचा समांतर तपास करुन अपहरीत बालकांचा शोध घेणेबाबत आदेशित करण्यात आले होते. त्यानुसार सन २०२३ मध्ये दाखल गुन्हयांचा तांत्रिक व अन्य स्त्रोताव्दारे कसोशिने तपास करुन १०४ गुन्हे उघड करुन ३५ अल्पवयीन मुले व ७१ अल्पवयीन मुलींचा असे एकुण १०६ अल्पवयीन बालकांचा शोध घेवुन त्यांना सुखरुप त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात आले आहे. त्यात इतर जिल्हयांमधुन व इतर राज्यांमधुन अपहरीत बालकांचा अपहरीत बालकांचा शोध घेण्यात आला आहे.

तसेच सन २०२२ साली बालकांच्या अपहरणातील १०६ गुन्हे उघड करुन शोध घेतलेल्या बालकांना सुखरुप त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले होते. मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय स्थापन झाले पासुन अनैतिक मानवी वाहतुक शाखा नालासोपारा यांनी सन २०२१ पावेतो बालकांच्या अपहरणाचे एकुण ८७ गुन्हे उघड करुन ८८ बालकांना त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात आले आहे.

अपहरीत बालकांचा शोध पोलीस उप आयुक्त, श्री.अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री मदन बल्लाल यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/संतोष चौधरी व पोहवा/ पवार, शेटये, किणी, शिंदे, मपोहवा/०५००४ डोईफोडे, मपोहवा/तिवले, जगदाळे, पाटील तसेच चालक पोहवा/ पागी, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी केला आहे.

-----------ooooooo----------